

REIKI VIDYA NIKETAN
सर्वे: सन्तु निरामयाः

रेकिब्रह्म

वर्ष १०वे अंक ६वा
मार्च २०२२

या लाटा म्हणजे भाग माझ्याच अस्तित्वाचा
येणं अन जाणं हाच स्थायी भाव त्यांचा
अलिप्त राहून पाहतो हा खेळ सारा
घेणं अन देणं अवघा चैतन्याचाच पसारा

email: reikibramhamasik@gmail.com

वैराग्य

हीच उपचार चिकित्सेची पहिली पायरी

"स्वतःच्या घरात राहून स्वतःच्या घराचे संरक्षण करता येत नाही, त्यासाठी तुमचे घर सोडून बाहेर येणे क्रमप्राप्त आहे." कारगिलच्या लढाईत पराक्रम गाजवणारा एक भारतीय सेनेचा कर्नल पदावरचा अधिकारी मला समजावत होता. स्वातंत्र्यानंतरच्या सहा दशकांमध्ये जे झाले नव्हते ते गेल्या काही वर्षांत आपल्या सीमांवर झाल्याचे आपण पाहतो. गेल्या काही वर्षांत भारतीय सेनेच्या ठाण्यांवर जेवढे हल्ले झाले तेवढे पहिले कधीच नाही झाले. हे असे का हे तो मला समजावत होता. २०१० पर्यंत ठाण्यांच्या बाहेरचा काही भाग सातत्याने सैन्याकडे सोपवलेला असायचा. त्यामुळे धोका जवळ यायच्या आधीच निपटला जायचा. परंतु २०१०ला तत्कालीन सरकारने काही कारणास्तव हे भूभाग सैन्याच्या अखत्यारीतून काढून घेतले आणि सैन्याला आता आपल्या कुंपणातूनच आपली काळजी घ्यावी लागली.

माझ्या साधारण ४०-५० वर्षांच्या अनुभवातून - सुरूवातीला एक व्यवस्थापकीय सल्लागार म्हणून आणि त्यानंतर एक अध्यात्मिक हिलर म्हणून- मी एक शिकलो कि आपण कधीही प्रश्नांच्या मैदानातून उत्तरे शोधायचा प्रयत्न नाही करायचा. कारण प्रश्नात्मक ऊर्जा आपल्याला सातत्याने खिळवून ठेवते आणि उत्तरांच्या शोधाला जाणे कठीण होऊन बसते. मनाची रचनाच बदलून जाते. प्रश्नांना प्राधान्य मिळते आणि उत्तरे कोठेतरी वळचणीत अडकून बसतात. येथेच एक साधक म्हणून आपल्याला सांभाळावे लागते. प्रश्नांच्या अंगणातून निसटून बाहेर यावे लागते. उत्तरांच्या मैदानातून प्रश्नांवर मात करता येते. जसे घराला आग लागली कि पहिले आपण घराबाहेर पडायला पाहीजे. केवळ स्वतःचा जीव वाचवण्याचा शूद्र विचार नसतो तो. तर बाहेर जाऊन उपकरणे आणून घराची आग बाहेरून विझवायला आपण समर्थ होतो. ते नुसते पलायन नसते. जसे प्रसिद्ध शास्त्रज्ञ गॅलिलीयो म्हणाला होता, मला पृथ्वीच्या बाहेर उभे राह्यला एक जागा द्या आणि मोठी तरफ द्या. मी संपूर्ण पृथ्वी उचलून दाखविन. पृथ्वीचे प्रश्न दूर करायचे असतील तर पृथ्वीच्या बाहेर पडणे आवश्यक आहे. येथे पृथ्वी हे प्रश्नांचे घर आहे आणि तरफ ही समर्थता आहे. साधू संत, सिद्ध पुरूष तर हेच करत असतात. संसाराच्या बाहेर राहून संसाराला दिशा देणे त्यांना शक्य होते कारण ते संसार सोडून राहू शकतात.

म्हणूनच हे सामान्य माणसाला कळत नाही. संसारात राहूनच त्याला प्रश्न सोडवायचे असतात. काही काळासाठी सुद्धा त्याला संसाराच्या सीमा ओलांडायच्या नसतात. कोणीही संसाराच्या बाहेर जाऊ लागला का त्याला थांबविण्याचे ते अतोनात प्रयत्न करतात. त्यांना कळत नाही कि हा माणूस संसाराच्या बाहेर राहूनच उत्तरे शोधणार व परतही येणार. ही साधकाची परीक्षा असते. तो स्वतःच त्या नात्यांच्या मायाजळात गुरफुटुन घेतो. तो विसरतो कि आपण ह्या मायाजाळातून बाहेर पडलो तरच परिस्थिती बदलू शकतो. रेकीच्या शिक्षणामध्ये दुसरी श्रेणि घेतलेल्या साधकांना हा प्रश्न नेहमीच सतावत असतो कि आपण आपल्यासाठी किंवा आपल्या जवळच्या लोकांसाठी केलेले संकल्प यशस्वी का होत नाहीत? दुसऱ्यांचा बाबतीत मात्र त्यांना सातत्याने यश मिळत असते. याचे मुख्य कारण असे आहे कि आपण आपल्यासाठी संकल्प करतो त्यावेळेला त्याच्या यशापयशामधे आपल्याला काहीतरी मिळवायचे असते किंवा गमवायचे असते. त्यात नफा-तोटा असतो. पण दुसऱ्यांच्या बाबतीत आपले असे हिशोब साधारणतः नसतात. तेथे काहीच मिळवायचे अथवा गमवायचे नसते. ह्या अपेक्षाच आपल्याला बाधा पोहोचवतात. संकल्पाची मूळ ताकदच निःशंक असण्यात असते. नितांत श्रद्धेची तेथे गरज असते. तेथे हिशोबाला, देण्या-घेण्याला थारा नसतो. येणाऱ्या परिणामांचा आपल्यावर प्रत्यक्ष प्रभाव फारसा नसतो.

त्यामुळेच स्वतः त्या प्रश्नांच्या परिस्थितीतून बाहेर पडणे ही उत्तम उपचारांची पहिली पायरी. सामान्य माणसांना मात्र हे फारसे रूचत नाही कारण त्यांना हे कळलेलेही नाही. त्यांना वाटते कि तुम्ही त्यांना सोडून पळत आहेत. त्यांना अशा परिस्थितीत एकट्याला सोडून जात आहेत. त्यांना हे समजावणे फार आवश्यक आहे कि आपण का पळत आहोत. एकदा का त्यांच्या लक्षात आले कि एखाद्या आगीच्या बंबवाल्यासारखे तुम्ही आगीपासून दूर पळून आपले साहित्य घेऊन आग विझवायला परत येणार आहात कि मग हिलींग झालेच समजा. आपली भूमिका प्रथम स्वतः समजणे आवश्यक आहे. मगच ती आपण दुसऱ्यांना समजावून देऊ शकतो.

स्वतःला थोडेसे वेगळे करायला शिका. ध्यानात ठेवा कि जेव्हा आपण दुसऱ्याला पकडतो किंवा दुसरा आपल्याला पकडतो तेव्हा आपण दुबळे होत असतो, अडकत असतो. चांगले हिलींग होण्यासाठी आपल्याला मोठे व्हावे लागते, मोकळे व्हावे लागते. मजबूत व्हावे लागते. अहंकाराच्या मर्यादीत क्षेत्रातून आत्मभावाच्या अमर्याद क्षेत्रात झेप घ्यावी लागते. आणि हे करून पुन्हा एकवार आपल्याच भूमिकेच्या घरट्यात येऊन घरट्यात विसावे लागते. हाच कदाचित एक मार्ग आहे.

अजित सर
फेब्रुवारी २५, २०२२

अष्टावक्र गीता

अध्याय ९वे

अजित सर

सूत्र १

कृताकृते च द्वंद्वानि कदा शांतानि कस्य वा।
एवं ज्ञात्वेह निर्वेदाद्भव त्यागपरोऽव्रती ॥१॥

अर्थ: अष्टावक्र म्हणतात केलेली आणि न केलेली कार्ये (किंवा कर्तव्ये) तसेच विरोधभासात्मक द्वैत कोणाला चुकली आहेत? हे जाणून आसक्तीमुक्त हो आणि संसारापासून संपूर्ण विरक्त होऊन सर्व त्यागासाठी संकल्प कर.

आपण सर्वच ह्या द्वैताच्या जगात जन्म घेतला आहे. एका अर्थी आपले आयुष्य त्यामुळे फारच मनोरंजक झाले आहे आणि प्रत्येक क्षणाला आणि प्रत्येक परिस्थितीत आपल्यासमोर एक पर्याय उभा असतो. पर्यायाशिवाय आपले आयुष्यच नसते. आपले आयुष्य म्हणजे विरोधी स्वभावांचे आणि मूल्यांचे मिश्रण असते. जसे आनंद आणि दु:ख, यश आणि अपयश, चांगले आणि वाईट असे. त्यामुळे आयुष्यात काय स्वीकारायचे आणि काय नाकारायचे हा पर्याय सातत्याने आपल्या आयुष्यात असतो. हे आयुष्य हेच आपला आभास आहे. सत्याच्या जगात विरोधाभासाला स्थानच नाही कारण तेथे द्वैताचाच अंत असतो. त्यामुळेच आपल्याला सातत्याने भीति असते. भीति अशाची कि आपण चुकीच्या पर्यायाची निवड करू. बरे, सत्य जगामध्ये कर्तव्याचा भावही नसतो. त्यामुळे कर्तव्य पूर्णपणे निभावू कि नाही हाही प्रश्न त्यात येत नाही. ह्या मधून बाहेर पडण्याचा एकच मार्ग म्हणजे ह्या दृश्य जगाचा आभास समजून घेणे आणि ह्या जगाशी संबंध तोडून टाकणे.

अष्टावक्राची वैराग्याची कल्पना काय असू शकते ह्याचा विचार करणे आवश्यक आहे. येथे अष्टावक्र केवळ स्थूल गोष्टींचा त्याग म्हणत नाहीत तर धार्मिक व्रत वैकल्ये किंवा अगदी कशाचातरी ध्यास – मग तो व्यावहारिक गोष्टींचा असो नाहीतर अध्यात्मिक, स्वर्गीय सुबत्तेचा असो ह्यांचाही विचार सांगत आहेत.

सूत्र २

कस्यापि तात धन्यस्य लोकचेष्टावलोकनात।
जीवितेच्छा बुभुक्षा च बुभुत्सोपशमं गताः ॥२॥

अर्थ: बाळा, असा परमेश्वरी कृपेच्या प्रभावाखाली ज्यांना इतरांची अवस्था बघून आयुष्यातील मौज मजा आणि शिक्षण यातून रस निघून गेला आहे अशी माणसे फार दुर्मिळ आहेत.

शहाणी माणसे अभ्यासातून आणि आजूबाजूच्या निरीक्षणातून शिकत असतात. त्यांना शिकण्यासाठी आपल्या स्वत:च्या वेदनांतून जाण्याची गरज भासत नाही. आजूबाजूच्या घटनांतून ते विलक्षण लवकर आणि सहजतेने शिकत असतात. निरीक्षणातून त्यांच्या लक्षात जगातला फोलपणा येत असतो. याचाच अर्थ असा कि इतरांची दु:खे आणि वेदना यातूनच त्यांना अशाश्वत सुखाची कल्पना आलेली असते. परंतु बहुसंख्य माणसे स्वत:च्या दु:खद अनुभवांतूनच शिकत असतात आणि त्यासाठी ह्या चिखलाच्या जगात स्वत:ला आकंठ बुडवून घेतात. दुसऱ्यांच्या दु:खांपासून शिकून ह्या जगापासून अलिप्त राहून जगणारे मात्र दुर्मिळच!

सूत्र ३

अनित्यं सर्वमेवेदम तापत्रितयदूषितम।
असारं निन्दितं हेयमिति निश्चित्य शाम्यति ॥३॥

अर्थ: तीन प्रकारच्या दु:खांनी सगळेच कलंकित आहे हे समजून आणि उमजून शहाणा माणूस शांतपणे जगत असतो. सतत बदलणारे असे अनित्य, अर्थहीन आणि निंद्य असे हे जग नकारणेच तो निवडतो.

येथे अष्टावक्र कदाचित सांगू इच्छितात कि तीन प्रकारांनी दु:खे माणसाला सतावत असतात. एक जे दु:ख ते मनाशी आणि शरीराशी जोडलेले असते. दुसऱ्या प्रकारचे दु:ख हे मानवी आणि अमानवी गोष्टींशी जोडलेले असते आणि तिसरे दु:ख म्हणजे नैसर्गिक कोपाने वादळे, पूर अशा झालेल्या दुर्घटना.

सूत्र ४

कोऽसौ कालो वयं किं वा यत्र द्वंद्वानि नो नृणाम ।
तान्युपेक्ष्य यथा प्राप्तवर्ती सिद्धिंवाप्नु यात ॥४॥

अर्थ: असा कोठला काळ आहे किंवा समय आहे कि जेथे द्वैतातील विरोधाभास नाहीत? जो ह्या चक्रात फसत नाही आणि हे सगळे सोडून जो मिळते त्यात समाधान मानतो तोच पूर्णत्वाला पोहोचतो.

अष्टावक्र येथे अधिकारवाणीने येथे सांगत आहेत कि माणसाला असा कोणताही वेळ किंवा समय नाही कि निव्वळ आनंद आणि सुख त्याच्या आयुष्यात असेल. त्या आनंदाला किंवा सुखाला नेहमीच एका दु:खाची आणि दुष्टतेची किनार असतेच. हे आपण पहिल्या श्लोकात पाहीले आहेच कि आपण नेहमीच विरोधाभासाच्या आणि द्वैताच्या वातावरणात जगत असतो. त्यामुळे निख्खळ आनंद आणि शांतिला तो वंचित राहतो. मानवाला जर शाश्वत सुखाची आणि शांतीची ओढ असेल तर त्याला हे लक्षात ठेवायला हवे ह्या भासात्मक जगाच्या मर्यादा ओलांडून त्याला पलिकडे जायलाच हवे. सामान्य जगाच्या सामान्य अनुभवांत न गुंतता त्याला सत्य युगात पाऊल टाकता यायला हवे.

सूत्र ५

नानामतं महर्षिणां साधुनां योगिनां तथा ।
दृष्ट्वा निर्वेदमापन्नः को न शाम्यति मानवः ॥५॥

अर्थ: मोठ मोठ्या संतांची, साधूंची आणि योग्यांची वेगवेगळी मतमतांतरे ऐकून भ्रमित होऊन शिकण्याच्या प्रक्रियेला संपूर्णपणे पाठ फिरवणाऱ्या कोणत्या माणसाला शांति प्राप्त होणार नाही?

जितकी माणसे तेवढी मते. स्वाभाविकपणे प्रत्येक विषयाला वेगवेगळे आणि भिन्न मतप्रवाह. शेवटी प्रत्येकाची मते ही त्याच्या स्वत:च्या दृष्टीकोनावर आधारित असतात. आईन्स्टाईनच्या सिद्धांतानुसार वेळ आणि स्थान ह्या दोन भिन्न गोष्टींवर अवलंबून असतात अनुभव. कोठल्याही महात्म्याने आपली मते लिहून ठेवली नाहीत. कारण त्यांना माहीत होते कि सत्य हे एकच असते पण त्याची समज मात्र वेगवेगळी असते. त्यांना हेही माहित असते कि सत्य हे अव्यक्तच असते ते व्यक्त केल्यावर सत्य राहत नाही. परंतु त्यांचे शिष्य आणि विद्यार्थी मात्र हे सगळे जगापुढे आणण्याच्या घाईत असतात. मग तेच दिव्य ज्ञान विकृत स्वरूपात लोकांपुढे येते आणि त्यातील मूळ सिद्धांत आपण विसरून जातो.

सूत्र ६

कृत्वा मूर्तिपरिज्ञानं चैतन्यस्य न किं गुरुः ।
निर्वेद समतायुक्त्या यस्तारयति संसृतेः ॥६॥

अर्थः संसारी जगरहाटीपासून अलिप्त होऊन आपल्या शुद्ध चैतन्याच्या मूळ स्वरूपाची पूर्ण ओळख झालेला संतुलित आणि पूर्ण पारख करून वैराग्य प्राप्त करून जन्म-पुनर्जन्माच्या चक्रातून मुक्त झालेला असा माणुस हाच खरा आध्यात्मिक गुरु नव्हे का?

संतुलन म्हणजेच समाधि किंवा समतोल. जेव्हा सर्व गोष्टींमधला भेद-भाव, विरोधाभास आणि साम्य हे सगळेच लय पावते त्यावेळेला द्वैत संपते. मग आपली आधि म्हणजेच बुद्धी चांगले आणि वाईट, सुख आणि दुःख असे काहीच राहत नाही. म्हणूनच ती सम+आधि संतुलीत आयुष्य. सकारात्मकता आणि नकारात्मकता या दोनोंच्या पलिकडची अवस्था. ही अवस्था अनुभव करणाराच खरा गुरू. खरा गुरू आपल्या शिष्याला शिकवण्यासाठी वेगवेगळ्या परिस्थिती तयार करतो. तो ज्ञान असेच देत नाही. तो आपल्या ज्ञानाला शिष्याच्या अनुभवांमध्ये घोळवून त्याचे एक अद्भुत रसायन तयार करतो. आणि ते बाळकडु आपल्या शिष्याला पाजतो.

सूत्र ७

पश्य भूतविकारांत्वं भूतमात्रान यथार्थत ।
तत्क्षणाद बंधनिर्मुक्तःस्वरूपस्थो भविष्यसि ॥७॥

अर्थः मूळ पंचमहाभूतांच्या आविष्कारांना एक आभास समजून त्या मूळ प्राथमिक महाभूतांकडे पाहत राहा. मग तू खरोखरच सर्व बंधनांतून मुक्त होऊन स्वतःच्या मूळ स्वभावाला प्राप्त होशील.

प्रत्येक गोष्ट जी आपण पाहत आहोत ती कोणत्यातरी मूळ तत्वाचे व्यक्त स्वरूप आहे. मूळ कारण तत्व तर अविनाशी आहे. निरंतर आहे. हे सत्य आहे. पांच मूळ तत्वे म्हणजेच वायु, आकाश, पृथ्वी, जल आणि अग्नि ही पंच महाभूते. बाकी सगळ्याच गोष्टी ह्या त्या पंच महाभूतांचे आविष्कार आहेत. हे समजणे हीच मुक्ती. मग साधक एका सत्याच्या सागरात पोहायला सुरूवात करतो. मग सगळ्या आवडी-निवडी विरघळून जातात. आत्म स्वभावाची ओळख पटते आणि साधक मुक्तीच्या आकाशात विहार करू लागतो.

सूत्र ८

वासना एव संसार इति सर्वा विमोच्छतः ।
तस्यागो वासना त्यागात स्थितिरद्य यथा तथा ॥८॥

अर्थः संसार म्हणजेच केवळ वासना. म्हणून वासनांचा त्याग कर. वासनांचा त्याग हाच संसाराचा त्याग. आता तू कोठेही जगू शकतोस.

ह्या श्लोकात दखल घेण्यासारखे दोन-चार महत्वाचे मुद्दे आहेत. जेथे संसार आहे तेथे वासना, अपेक्षा, इच्छा ह्या सर्व गोष्टी आहेत हे सत्य आहे. त्यामुळे संसार आणि वासना यांचा अतूट संबंध आहे. त्यांना वेगळे करताच येत नाही. त्यामुळे संसाराचा त्याग हाच वासनांचा त्याग आहे. संपूर्ण वैश्विक अवकाशाचा संसार हा एक हिस्सा आहे. त्यामुळे एकदा का संसारातील वासना संपली कि साधक मुक्तपणे विश्वात कोठेही विहार करू शकतो. मग त्याला बाधा नाही. मग त्याला मर्यादा नाहीत. मग त्याला नाम-रूप नाही. वासनांच्या पलिकडे जाणे ही प्रक्रियाच त्यागाची जननी आहे.



पहिला गुरुचरित्र पारायण अनुभव

आशिष मुळे, वडोदरा.

गेल्या वर्षी जानेवारीत देवरुख आश्रम भेटि दरम्यान गुरुचरित्र पारायण या संकल्पनेशी माझी ओळख झाली. तेव्हा पुण्यातील आशा काकूंनी पारायण केले, त्यानंतर बडोदा येथील चंद्रेशभाईंच्या घरी पारायण प्रक्रिया पाहिली. वर्षभरात शिवांगच्या गुरुचरित्राच्या वाचनानेही अधिक जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली. एक दिवसीय पारायण कार्यक्रमात मी गुजरातीतील काही अध्याय वाचले सुध्दा. एकदा बीज पेरल्यानंतर, माझ्या पहिल्या पारायणाच्या तयारीच्या पुढील क्रिया माझ्या जाणीवपूर्वक प्रयत्नांशिवाय संरेखित झाल्या. आता जेव्हा मी याचा विचार करतो तेव्हा असे वाटते की मी फक्त एक माध्यम होतो, सर्व काही आपोआप घडले.

स्वामी मूर्ती – नोव्हेंबर २०२१ च्या तिसऱ्या आठवडयात माझ्या पुण्यातील एका दुकानाच्या भेटी दरम्यान याची सुरुवात झाली. हे दुकान सर्व पूजा समारंभ आणि इतर विधींशी संबंधीत साहित्यसाठी होते. मी दुकानाच्या मालकाला भेटलो. एका वृध्द महिलेला आणि माझ्या मुलाच्या, खुशच्या येणाऱ्या मुंज सोहळ्यासाठी काही गोष्टी दाखवण्याची विनंती केली. कुतुहलातून हा विचार माझ्या मनात आला आणि मी त्यांना विचारले की त्यांच्याकडे स्वामी समर्थांची मूर्ती आहे का? त्यांनी दाखवलेल्या दोन मूर्तींनी मी आकर्षित झालो. त्यापैकी एकाची, कालांतराने ह्या माझ्या पहिल्या पारायणावेळेस प्रमुख देवता / पारायण निरिक्षक म्हणून स्थापाना झाली.

पारायणाचे ठिकाण – बडोद्यात आमचे दुसरे घर आहे, जिथे मी आणि माझी पत्नी स्वतंत्र जीवनशैली कशी व्यवस्थापित करू शकतो हे पाहण्यासाठी राहण्याचा विचार करत होतो. दत्त जयंती (१८ डिसेंबर) च्या आठवडयात आम्ही तिथे राहू लागलो. आम्ही तिथे अग्निहोत्र करू लागलो. मला तिथे एक गोष्ट आवडू लागली ती म्हणजे मी आमच्या सध्याच्या घरातील मंदिरापेक्षा आमच्याकडे असलेल्या छोटया मंदिराची पूजा थोडया मोकळ्या पध्दतीने करू शकलो. मी आणि माझा मुलगा सकाळी नवीन ठिकाणी संध्या करू लागतो. त्यामुळे आता असं वाटतं की पारायणाची जागा तेव्हापासून तयार होऊ लागली होती.

गुरुचरित्र पुस्तकाचे स्वागत – दत्त जयंतीच्या दिवसापेक्षा गुरू चरित्र पुस्तकाचे स्वागत करण्यासाठी याहून अधिक शुभ दिवस असूच शकत नाही. १७ डिसेंबरच्या पूर्वसंध्येला, मी बडोद्यात दांडिया बाजारातील सिध्दिविनायक मंदिराजवळील एका जुन्या आणि सुप्रसिध्द पुस्तकांच्या दुकानात गेलो आणि मराठी भाषेचे पुस्तक घरी आणले. १८ डिसेंबर दत्त जयंतीला आम्ही आमच्या घरी पुस्तक पूजा केली. तोपर्यंत पहिल्या पारायणाच्या तारखा मी ठरवल्या नव्हत्या. पण दत्त जंयतीच्या दिवशी देवरुख मठातील गुरुजींसोबत झालेल्या एका छोटया फोन कॉलने जादू केली. मला पारायण सुरु करण्याची लवकरात लवकर संधी मिळविण्यासाठी गुरुजींसोबतचे काही शब्द पुरेसे होते.

गुरुजींच्या मार्गर्शनाने, असे ठरले की मी माझे पहिले गुरुचरित्र पारायण ६ ते १२ जानेवारी २०२१ या कालवधीत करणार आहे. वडीलांनी आणि सर्व कुटुंबीयांनी लगेचच या कल्पनेला पाठिंबा दिला आणि माझ्या कार्याला मदत करण्यासाठी त्यांच्या योगदानाची योजना सुरु झाली. आई, बाबा त्यांचा आधार देऊ लागले. बायको आणि मुलानेही माझ्या शेडयूलशी जुळवून घेतलं. ज्यांनी यापूर्वी अनेकदा पारायण केले आहे, अश्या चंद्रेशभाई आणि त्यांचे कुटुंब, माझे मावशी–काका यांचे समर्थ मार्गदर्शन लाभले. त्यांच्याकडून पारायणाच्या दिवसात अनुष्ठानाचे (काय करावे आणि काय करू नये) नियम समजून घेतले. मावशी आणि काकांनी अखंड दिवा भेट दिला. डिसेंबर मध्ये शिवांगला ७ दिवसांचे पारायण करताना पाहणे देखील प्रेरणादायी होते.

पारायण सप्ताहासाठी मला ऑफिसमधून सुट्टी घेता आली नाही, म्हणून मी ठरवलं की पहाटे ४ ते ७ या वेळेत गुरु चरित्र वाचेन आणि मग ऑफिसला जाईन आणि आवश्यक तेवढाच व्यवहार आणि बोल–चाल करेन. मी नेहमी सकाळी लवकर उठतो, त्यामुळे मला आत्मविश्वास होता की पहाटे पारायण वाचू शकेन.

गुरु चरित्र वाचताना संपूर्ण आठवडा हा एक आनंददायी अनुभव होता, जी भाषा शतकानुशतके जुनी आहे, ते गद्य वाचण्याचा प्रयत्न करणे (जसा की एखादा सामान्य ब्राम्हण लयब्ध्दपणे श्लोक उच्चारेल). मला असे वाटते की गुरु चरित्राच्या मूळ देवतेनेही या सात दिवसात माझी परिक्षा घेतली आणि असे वाटले की मी एकंदर जादुई अनुभवाचा भाग आहे. मला खात्री आहे की असे आणखी आश्चर्यकारक क्षण आले असतील, परंतु ज्या काही घटना घडल्या आणि ज्या मला जाणीवपूर्वक आठवतात त्या खालील प्रमाणे आहेत:

- ७ चे ७ दिवस आतापर्यंतच्या हिवाळ्यातील सर्वात थंड दिवस होते. पारायणाच्या आधी आणि नंतरचे दिवस तुलनेने जास्त गरम होते. सतरंजी घालून जमिनीवर झोपणे आणि कडाक्याच्या थंडीत रोज पहाटे ३ वाजता उठणे, सर्व विलंबाचे विचार झटकून टाकणे आणि वाचनासाठी बसण्यापूर्वी आंघोळ करणे ही खूप मोठी कसोटी होती. तरीही एकदा पण वेळ चुकलो, असे घडले नाही.

- पहिला दिवस पहिला अध्याय – जेव्हा मी वाचायला सुरुवात केली तेव्हा माझ्यासाठी भाषा पूर्णपणे नवीन होती. मला ते अवघड वाटले. हार मानण्याचा विचार एकदा मनात आला, पण स्वामी आणि गुरुजींचे स्मरण करून, मी जाणीवपूर्वक एक ठाम विचार केला की काहीही झाले तरी मी वाचन थांबवणार नाही. आणि मग असे झाले की, हळूहळू मला वाचनाची गोडी वाटू लागली. मला भाषा समजू लागली, मीही लयबध्द पध्दतीने ओळी म्हणायला सुरुवात केली आणि नंतर सर्व वेळ आनंद वाटू लागला.

- मी सहसा दिवसातून एकदा तरी, संध्यकाळी अन्नात मीठ खात होतो. एका संध्याकाळी, माझ्या पत्नीने बटाटा भाजी (कांदा आणि लसूण शिवाय) आणि डोसा बनवला. आम्ही पहिला डोसा स्वामींना नैवेद्य म्हणून दिला. ५ मिनिटांनंतर मी ताट परत घ्यायला गेलो. स्वयंपाकघर आणि मंदिर शेजारी शेजारी आहेत. ज्या क्षणी मी स्वामींसमोर ठेवलेले ताट उचलले, बरोबर त्याच क्षणी शेजारी उभ्या असलेल्या माझ्या पत्नीच्या मनात विचार आला की ती भाजीमध्ये मीठ टाकायला विसरली आहे. आम्ही तपासले आणि ते खरे होते. आम्हाला लगेच समजले की हा स्वामींचा संवाद आहे, कदाचित या घटनेतून त्यांची उपस्थिती दर्शवत आहेत.

- ५ वा दिवस, गुरुचरित्राच्या तीन सर्वात मोठया अध्यायांचा दिवस – अत्यंत थंडीत पहाटे पाऊणे तीन वाजता मी उठलो, तेव्हा मला कळले की आमच्या घरात पाण्याची कमतरता आहे. पाणी येत नव्हते. आम्ही एका अपार्टमेंट मध्ये राहतो आणि त्यामुळे फ्लॅटमधील कोणालाही एवढया पहाटे मोटार चालू करण्यासाठी उठवणे शक्य नव्हते. आदल्या रात्री एक बादली पाणी भरले होते, म्हणून मी आंघोळ केली आणि पहाटे ४.०५ ला पारायण करायला बसलो. ४.३० च्या सुमारास लाईट गेली. मी वाचत असल्याने मला माझ्या आसनावरून उठता येत नव्हते. साधारणापणे रोज मी माझ्या वाचनाच्या वेळी माझा मोबाईल फोन चार्जिंगसाठी ठेवत असे जेणेकरून तो ऑफिसला जायच्या आधी चार्ज होईल. पण त्यादिवशी वाचताना मी मोबाईल शेजारी ठेवला होता. त्यामुळे प्रतिक्षिप्त क्रिया झाल्याप्रमाणे मी मोबाईलचा लाईट चालू करुन सहपणे पुढे वाचन चालू केले. त्या दिवशी पूर्ण वाचन मोबाईलच्या पांढऱ्या प्रकाशात करतानाही आनंदच वाटत होता. असा एकही क्षण नव्हता जेव्हा मला ते अवघड वाटले, उलट ते सोपे होते. माझ्या वाचनानंतर अग्निहोत्राची वेळ झाली. अग्निहोत्राच्या पहिल्या 'ओम' च्या तालावर लाईट आली आणि काही सेकंदात वॉटर फिल्टरचा आवाजही ऐकू आला, जो पाणीपुरवठा सुरु झाल्यामुळे भरू लागला होता.

मला खात्री आहे की असे बरेच अनुभव आले असतील, विशेषत: ७ व्या दिवशी, पण जाणीवपूर्वक ते आठवत नाही आहेत. पण एक मात्र नक्की की सातही दिवस आणि पूर्णाहूती आणि महाप्रसादा दम्यान वातावरणात जाणवणारी उर्जा चैतन्यदायी होती ज्याचा अनुभव तेथील उपस्थीत सर्वांनी घेतला.

स्वामी, गुरुजी, माझे आई बाबा, सर्व वडील मंडळी आणि माझ्या पहिल्या गुरुचरीत्र पारायण्याच्या अनुभवात सहभागी झालेल्या सर्वांचे मी आभार मानतो. अशी आणखी पारायणे करण्याची मी वाट पहात आहे.

स्वामी विवेकानंद आणि ध्यान

लेखांक ५ वा

लेखकः श्री प्रांजल जोशी, पुणे

दुसऱ्याला दोष देणे थांबवा, स्वतःचे भविष्य स्वतः घडवा.

आयुष्यातील चुकांसाठी दुसऱ्या कोणाला उगीच दोष देत बसू नका, सक्षम व्हा. जे घडले त्याची संपूर्ण जबाबदारी स्वतःवर घ्या. मनाला हे एकदा समजावून सांगा, की "हे दुःख, आपत्ती, दुर्दशा वा संकट, जे काही मी भोगत आहे ना, ते माझ्या स्वतःच्याच कर्माचा परिपाक आहे. त्यामुळे स्वाभाविकच यातून बाहेर पडण्यासाठीची धडपड अन प्रक्रिया देखील मला एकटयालाच करावी लागणार आहे.

जे मी सुरु केले ते मीच संपवू शकतो. जर सुरुवात माझ्यापासून तर शेवट देखील माझ्यातूनच होणार आहे. इतर कोणी मी निर्माण केलेले कधीही नष्ट करू शकणार नाही. ते फक्त मीच नष्ट करू शकतो, बदलू शकतो." म्हणून आता निराशा सोडा, उभे रहा, धाडसी बना, बलवान व्हा. संपूर्ण जबाबदारी तुमच्या स्वतःवर घ्या. हे समजून घ्या की तुम्ही स्वतःच तुमच्या जीवनाचे निर्माते आहात. (मीच आहे माझ्या जीवनाचा शिल्पकार). तुमचे नशीब तुमच्याच हातात आहे. तुम्हाला हवी असलेली सर्व शक्ती आणि सिध्दी तुमच्यातच आहे.

चला तर मग, उठा अन लागा कामाला. स्वतःचे भविष्य स्वतः घडवा. भूतकाळात उगाच रमू नका, घडायचे ते घडून गेले. त्याला तिथे त्या भूतकाळातच असू देत. तुमच्यासमोर तुमचे उज्वल भविष्य आहे. तुमचा प्रत्येक शब्द, प्रत्येक विचार आणि प्रत्येक कृती हा उद्यासाठीचा तुमचा मार्ग तयार करीत आहे. तुमचे प्रत्येक पाऊल तुमच्या जीवनाची पुढची पायरी आहे. त्यामुळे तुमचे वाईट विचार आणि वाईट कार्ये जर तुम्हाला अपयशाच्या खाईत लोटण्यासाठी वाघासारखे दबा धरून तयार असतील, तर लक्षात ठेवा की तुमचे चांगले विचार आणि चांगली कृत्ये लाखो देवदूतांच्या सामर्थ्याने तुमचा बचाव करण्यासाठी अन तुम्हाला उज्वल भवितव्याकडे घेऊन जाण्यासाठी सदैव तयार आहेत.

हे जग ना चांगले आहे ना वाईट !

पृथ्वीवरील एकूण लोकसंख्येपैकी एक दशलक्षांश स्त्री आणि पुरूष जरी फक्त काही क्षणांसाठी शांत बसले आणि म्हणाले ना "की हे सारे जग म्हणजे मीच आहे. या सृष्टीच्या चराचरातील प्रत्येक गोष्ट, मग मनुष्य काय अन प्राणी काय सर्व काही एकाच अद्वैताची विविध रूपे आहेत"; तर मग संपूर्ण विश्व अर्ध्या तासात बदलून जाईल.

राग, लोभ, द्वेष, मत्सर, हेवेदावे अन हव्यासाने भरलेल्या विचारांचा जगाच्या अगदी कानाकोपऱ्यात सातत्याने चाललेला भडीमार थांबवून, आपण हा विचार करू यात ना "की ता विश्वात सर्वकाही आहे ते मीच आहे, माझेच आहे." कारण तुम्ही या जगाकडे जसे पाहता आणि तुम्हाला हे जग जसे वाटते. ते प्रत्यक्षात मग तसेच असते.

कारण तुमच्यामध्ये जोपर्यंत काही खराबी नाही, तोपर्यंत तुम्ही ती खराबी बाहेर पाहू तरी कशी शकता? चोराला पाहण्यासाठी चोरीची जाण आतमध्ये हवी ना? खुन्याला पाहण्यासाठी खून म्हणजे काय हे तुम्हाला स्वतःला माहिती हवे ना? जेव्हा तुमच्यामध्ये परिवर्तन होईल, तुम्ही स्वतः चांगले व्हाल, तेव्हा आपोआपच जगातून वाईट गोष्टी नाहीश्या होतील. संपूर्ण विश्वच बदलून जाईल.

इथे आणखी एक गोष्ट शिकायची आहे. आपल्या कोणालाच सर्व वस्तुनिष्ठ वातावरणावर विजय मिळवणे शक्य नाही. आपण ते करूच शकत नाही. लहान माशाला त्याच्या शत्रूंपासून पाण्यात स्वत:चा बचाव करायचा असतो. त्याला वाटते की आपण उडून जावे. मग तो काय करतो. पंख विकसित करून पक्षी बनतो. स्वत:ला उंचावतो. ना मोठया माशांना बदलतो ना पाण्याला ना हवेला, तो बदलतो स्वत:ला. बदल हा नेहमीच व्यक्तिनिष्ठ असतो. आपण बाहेर काहीच बदलू शकत नाही, पण आत स्वत:ला बदलवू शकतो, अन एकदा का स्वत:ला बदलले की मग आपोआपच बाहेर बदल घडतो.

उत्क्रांतीच्या बदलाचा अभ्यास केल्यास आपल्याला हे लक्षात येईल की निसर्गावर विजय मिळविणे हे त्या व्यक्तीच्या, विषयाच्या वा पदार्थाच्या बदलण्यावर अवलंबून असते. ते व्यक्तिनिष्ठ अन सापेक्ष आहे. हे तत्व मग धर्माला आणि नैतिकतेला लावून पहा आणि तुमच्या लक्षात येईल की वाईट गोष्टींवर विजय मिळावणे केवळ तुमच्यातील बदलावरच अवलंबून आहे. अद्वैत सिध्दांतामध्ये म्हणूनच तर भर हा व्यक्तिनिष्ठ बदलावर आहे. वाईट गोष्टींबद्दल आणि दु:खाबद्दल बोलणे हे मुर्खपणाचे आहे, कारण ते मुळातच बाहेर कुठे अस्तित्वात नाही.

मी आत्मविश्वासाने अन ठासून हे सांगू शकतो की एकमेव धर्म जो या विज्ञान तत्वावर आधारित आहे आणि त्यामुळेच आधुनिक पाश्चिमात्य विज्ञानापेक्षा या बाबतीत काकणभर पुढेच आहे, मग ते भौतिक विज्ञान असो वा अध्यात्मिक, तो म्हणजे "सनातन अद्वैत धर्म" आणि कदाचित म्हणूनच आधुनिक शास्त्रज्ञांना खूपच आकर्षित करतो, अन अभ्यासावा अन अंगिकारावासा वाटतो.

एक छोटी दृष्टांत कथा

कल्पना करा अशा चित्राची ज्यामध्ये हे शरीर म्हणजे एक रथ आहे ज्यावर तुम्ही (आत्मा) स्वार झालेले आहात. बुध्दी ह्या रथाचा सारथी आहे, मन लगाम आणि इंद्रिये म्हणजे घोडे. ज्यांची इंद्रिये मनाच्या ताब्यात आहेत आणि मन बुध्दीच्या (विवेकाच्या) त्याची घोडदौड आपल्या अंतिम ध्येयाकडे नक्कीच चालू आहे. पण ज्या माणसाचे घोडे (इंद्रिये) मनाच्या ताब्यात नाहीत अन अनियंत्रित मनाचा लगाम बुध्दीच्या हातून निसटला आहे, त्याचा रथ आत्मनाशाकडे चालला आहे, हे का वेगळे सांगायला हवे?

जलाशय आणि योगी

तेजश्री रानडे, देवगड

जलाशयात या कोणी ओतले चैतन्याचे थेंब
काळजातही भरून आले नव्या ऋतूचे मेघ ॥१॥

मेघ सावळे भरून येती
बरसण्यास मग लगबग करती
चैतन्याच्या सरींत अवघी सृष्टी ओलीचिंब ॥२॥

जलाशयाच्या काठी योगी
साधनेत आनंद भोगी
जलाशयाशी जडले आगळेच अनुबंध ॥३॥

योगी म्हणतो हा जलाशय अंतरंगीचा डोह
तरंग उठती पाण्यावरती जणू माया आणि मोह
अलिप्त राहूनी पाहत जावे सोडूनी सारे बंध ॥४॥

काळ लोटतो, वर्षे सरती
साधनेसही येई भरती
जलाशयाचा प्रवास चालू योगीही साधनामग्न ॥५॥

जलाशयाची झाली सरिता
गाऊ लागली सागरगाथा
पडू लागले अस्तित्वात तिच्याही सागराचे प्रतिबिंब ॥६॥

योग्यास आली आत्मप्रचिती
जणू उजळून येती हजार ज्योती
चैतन्याने भरून गेले योग्याचे अंतरंग ॥७॥

योगी अन तो जलाशय पोहोचले गंतण्याला
प्रवास करून अखेर जाती आपल्या पूर्णत्वाला
आता केवळ दरवळू लागला परमात्म्याचा गंध ॥८॥

कभी नही देखे ऐसे गुरूवर..

(भाग ६)

सौ. वंदना तेलंग, ठाणे



माझ्या भक्तांनी एकमेकांना मदत करायला हवी..

जय जय स्वामी समर्थ ह्या चित्र मालिकेबद्दल आपण गेल्या काही अंकांत लिहीत आहोत. गेल्या आठवड्यातील एका सत्रात स्वामी आपल्या भक्तांना सांगत होते कि "माझ्या भक्तांनी एकमेकांना मदत करायला हवी." आपले गुरूजी नेहमीच सांगत आले आहेत कि चांगल्या माणसांनी एकत्र येऊन जगायला हवे. आज जगामध्ये आपण पाहत आहोत कि वाईट माणसे एकत्र येऊन थैमान घालत आहेत. भ्रष्टाचारी एकमेकांच्या संगतीने भ्रष्ट कारभार करून सामान्य माणसाला लुटत आहेत. कारण ते संघटीत आहेत. जगातील वाईटपणा वाढलेला नाही तर चांगुलपणाचे वर्तन कमी झाले आहे. चांगुलपणाचा विचार संपलेला नाही, पण त्याचे आविष्कार सामान्यत: दिसत नाहीत. कारण चांगली माणसे आपल्या चांगल्या कल्पनांना आणि चांगल्या विचारांना प्रदर्शित करत नाहीत. वाईट माणसे मात्र आपल्या वाईटपणाचा वापर करत आहेत. गुरूजी आपल्या बऱ्याचश्या साधकांना हेही सांगत आहेत कि तुम्ही जे काही आहात ते स्वामींमुळे. स्वामींचे आपल्या आयुष्यात असणे हे खरी तर स्वामींचीच योजना आहे. स्वामींना जेव्हा परिवर्तन घडवायचे असते तेव्हा ते परिस्थिती तयार करत असतात आणि आपल्या भक्तांना कोणती ना कोणती भूमिका देतात. ती भूमिका उत्तम रितीने वठवता यायला हवी. केवळ तेवढेच नव्हे तर प्रत्येकाचे एक कार्यक्षेत्र असते, त्या कार्यक्षेत्राच्या प्रभावाखाली येणारी काही माणसे असतात. उदा. एखाद्या सी.ए. कडे येणाऱ्या माणसांचा समूह आणि एखाद्या वैद्याकडे येणाऱ्या माणसांचा समूह वेगळा असतो, बँकेत काम करणाऱ्या माणसांच्या कार्यक्षेत्रात वेगळी माणसे येतात. त्या सर्वांपर्यंत पोहोचून त्यांना आपल्या प्रभावाखाली आणून स्वामी भक्तीच्या मार्गाने चालते करून स्वामींच्या चरणावर आणणे हेच आपले कर्तव्य आहे. आपण सामान्यांसारखे केवळ पैसा आणि प्रसिद्धीच्या मागे लागू नये. आपली भूमिका कधी विसरू नये. आपण जे काही आहोत ते आपल्या स्वकर्तृत्वाने नव्हे तर स्वामींच्या आशिर्वादाने आणि त्यांच्या संकल्पाने घडलो आहोत हे नेहमी लक्षात ठेवावे. आणि आपल्या इतर साधकांना मदत करून त्यांनाही आयुष्यात पुढे जाण्याच्या दृष्टिने सहकार्य करावे. ह्याच दृष्टिकोनातून गुरूजींच्या प्रेरणेने देवरूख स्पिरिटुयल प्रॉवेस तसेच देवरूख साधक पेठ ह्या संस्थांची स्थापना केली गेली. शहरातील भक्तांनी गावागावातील भक्तांना मदत करून त्यांची सर्वांगीण उन्नति करावी, ग्रामीण भागात असलेल्या साधकांना उत्पन्नाच्या संधी प्राप्त करून द्याव्यात, गावागावातील कलाकारांना त्यांच्या प्रतिभेचा आविष्कार समस्त जगासमोर आणण्याची सुसंधी द्यावी. हेच तर स्वामी सांगत आहेत. "एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ" ह्यातूनच मग एका सात्विक जगाची निर्मिती होईल.

(भाग ४)

देमो दूक – ले लदाख (खूप सुंदर लदाख)

यामिनी कुटुंबळे (वडोदरा).

दिवस १०: लेह ते कारगिल

आज आम्ही भारतीय सैनिकांना समर्पित लेह मधील "हॉल ऑफ़ फ़ेम" ला भेट दिली. सर्व कामगिरी पाहून मला त्यांचा अभिमान वाटला. ते माझ्यासाठी सुपर हिरोच आहेत. आमचे पुढील गंतव्य चुंबकीय टेकडी होते. निसर्गाचे आणखी एक आश्चर्य. आमची वाहने टेकडीच्या उताराच्या विरुध्द दिशेने आपोआप जात होती. मग आम्ही पथ्थर साहिब गुरुद्वारा या सर्वात आदरणीय स्थळाला भेट दिली. आख्यायिका अशी आहे की, लडाखमध्ये मुक्काम असताना गुरु नानक साहिब यांच्यावर एका राक्षसाने हल्ला केला होता. गुरु ध्यान करत असताना राक्षसाने गुरुंवर एक मोठा दगड फेकला, पण गुरु नानक वाचले. रागाच्या भरात राक्षसाने त्याच्या पायाने एक मोठा दगड त्यांच्यावर ढकलला. पण लवकरच त्याच्या लक्षात आले की, दगड मेणासारखा मऊ झाला आहे. त्याच्या सामोर जी व्यक्ती आहे ती कोणी साधीसुधी नाही हे त्याच्या लक्षात आले. राक्षसाने क्षमा मागितली आणि तो निघून गेला. लेह ट्रनिमू रस्ता बांधायचा होता त्यावेळेपर्यंत म्हणजेच १९७०च्या उत्तरार्धापर्यंत ही दंतकथा काळाच्या ओघात लोप पावली. पण रस्त्याचे बांधकाम चालू असताना कामगारांनी केलेल्या सर्व प्रयत्नांनंतरही दगड हलला नाही. स्थानिक लामा घटनास्थळी पोहोचले, त्यांनी दगडाविषयी आणि नानक लामांविषयी सांगितले. राक्षसाच्या पायाचे ठसे आणि गुरूंच्या शरिराचा आकार पहाताना असे वाटत होते कि दैव किती बलवत्तर आहे. असे म्हंटले जाते की त्यानंतर, नानक लामा बांधकाम स्थळाच्या प्रमुखांच्या स्वप्नात दिसले आणि त्यांना पथ्थर हलवू नका असे सांगितले. अशा प्रकारे गुरुद्वारा पथ्थर साहिब बांधण्यात आले. गर्भगृहात असताना मला शांतीचा अनुभव आला. असे वाटले की माझ्या मनात कोणतीही विचार प्रक्रिया चालत नाही आहे. सर्व कंपने आणि उर्जा अनुभवताना असे वाटत होते कि ध्यान आपोआपच होत आहे.

या अद्भुत अनुभवानंतर आम्ही कारगिल मधील आमच्या कैसल वर पोहोचलो. सूर्योदय आणि सूर्यास्ताचे अद्भुत दृश्य पहात आम्ही हॉटेल व्हाईट कैसल च्या छतावरील खोल्यांमध्ये राहिलो. पथ्थर साहिब च्या भेटीनंतर आमच्या उर्जेत झालेली वाढ लक्षणीय होती. ही गोष्ट आम्हाला योग वर्गाचा आनंद घेताना लक्षात आली. येथे आम्ही आमच्या दिवसाची उज्ज्वल किरमिजी सूर्यास्तासह सांगता केली.

दिवस ११ : कारगिल ते श्रीनगर

सूर्योदय समयी, महिन्याचा पहिला दिवस, योग वर्गासह सुरु झाला. आम्ही व्यायाम केला, सूर्यनमस्कार केले आणि आमच्या केसल मधून कूच केली. श्रीनगरला जाताना वाटेत आम्ही कारगिल युद्ध संग्रहालयाला भेट दिली, जिथे आम्हाला कारगिल युद्धावरील माहितीपट दाखवण्यात आले. आम्ही टायगर हिल, इतर शिखरे, युद्धाच्यावेळी पकडलेली शस्त्रे आणि दारुगोळा पाहिला. श्रीनगर आणि लेह दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १ या मार्गावर झोजिला पास हा जगातील सर्वात धोकादायक पर्वतीय रस्त्यांपैकी एक आहे. "झोजीला पास" सुमारे २५

किमी लांब आहे. हा रस्ता तुमच्या रवीवारच्या फेरफटक्यासाठी नाही. ह्याच नाव झोजी म्हणजे हिमवृष्टी असल्याने इथे नेहमी सोसाट्याचा वारा आणि जोरदार हिमवृष्टी होत असते. ज्यामुळे हा पास "हिमवृष्टीचा" पास म्हणून ओळखला जातो. आम्ही सोनमर्गला घोडेस्वारी आणि आमच्या दुपारच्या जेवणाचा आनंद घेतला. श्रीनगरला पोहोचल्यानंतर आम्ही डल तलावातील आमच्या हाऊस बोट मध्ये मुक्काम केला.

दैवाने आमच्या समोर काय वाढून ठेवले आहे ह्यापासून अनभिज्ञ आम्ही, आमचा वेळ आनंदात घालवत होतो. रात्री १०च्या सुमारास बीएसएनएल वगळता सर्व दूरसंचार आणि इंटरनेट नेटवर्क अचानक बंद झाले. त्याबद्दल चौकशी केल्यानंतर आम्हाला कळले की काश्मिरचे फुटीरतावादी नेते सय्यद अली गिलानी यांचे आजारपणामुळे निधन झाले. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर अचानक तणावाची लाट स्पष्ट दिसू लागली कारण आम्ही कुटुंबापासून आणि आमच्या टूर ऑपरेटरच्या संपर्कापासून अचानक दूर झालो होतो. दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत वाट पाहणे हाच पर्याय शिल्लक होता.

दिवस १२: श्रीनगर

प्रवासाच्या योजनेप्रमाणे आज शिकारा राईड चा दिवस होता, पण उत्साह कधीच मावळून गेला होता. तरीही आम्ही काही दुकानांना भेट दिली आणि अचानक एका दुकानात आम्हाला वाय-फाय कनेक्टिव्हिटी मिळाली. दुकानदार देखिल आश्चर्यचकीत झाला. आम्ही आमच्या कुटुंबाशी आणि टूर ऑपरेटरशी संवाद साधला. आमच्या टूर ऑपरेटर कडून पुढील सुचना मिळाल्या आणि त्याने लगेच आम्हाला आमच्या हॉटेल वर पोचवले. आम्ही हॉटेलमध्येच रहाण्याचा निर्णय घेतला. हॉटेलच्या खिडकीमधून, शहरात तैनात असलेली सर्व फ़ौज पाहून आम्हाला श्रीनगर मधून बाहेर कसे पडणार ह्याची थोडी काळजी वाटू लागली. रात्री १० वाजता आमचा ड्रायव्हर आम्हाला भेटायला आला आणि आमच्या कुटुंबाशी संपर्क साधण्यासाठी मोबाईल दिला.

दिवस १३: श्रीनगर ते वडोदरा

संपूर्ण प्रवासातील ही सर्वात व्यस्त सकाळ होती. विमानतळावर पोहोचताच सगळीकडे गोंधळाचे वातावरण दिसले. माहितीच्या अभावामुळे अनेक पर्यटक आपापल्या विमानात चढू शकले नाहीत. अगदी आमच्या विमानाबद्दल पण आम्हाला खात्री नव्हती. स्क्रीनवर आमच्या विमानाची माहिती न दिसल्यामुळे, आम्ही थोडे खचलो. आम्हाला आमच्या बुकिंग आणि विमानाची कशीबशी माहिती मिळाली. त्यानंतर सुरक्षा तपासणी पुर्ण करून आम्ही विमानात चढलो. या सगळ्या काळात मी 'दैवाकडून' मदत मागत होते. माझ्या फ्लाईटला उशिर झाल्याने बोर्डिंगचा आनंद फार काळ टिकला नाही. मला माझे दुसरे विमान मुंबई विमानतळावर दीड तासाऐवजी ४५ मिनीटात पकडावे लागले. अशाप्रकारे माझा एकमेव आधार असणाऱ्या 'रेकि'ची मदत घेऊन मी माझ्या कनेक्टिंग फ्लाईट मध्ये यशस्वीरीत्या चढले. घरी पोहोचल्यावर तब्बल २४ तासानंतर मी माझ्या घरच्यांशी बोलत होते.

या २४ तासादरम्यान जरी आम्ही खुप प्रवास करत नव्हतो तरी भावनांचे उतारचढाव जबरदस्त होते. या गोंधळात आम्ही बऱ्यापैकी स्थिर होतो. वेगवेगळ्या माध्यमातून आम्हाला सतत मदत मिळत होती ते मला जाणवत होते. उदा. फक्त माझ्या आणि माझ्या बहिणीच्या फ्लाईटचे वेळापत्रक बदलले नव्हते, एअरलाइन ग्राउंड फोर्स आम्हाला प्रत्येक वेळी मदत करत होती, मांजरीचे पिल्लू अचानक बाहेर येऊन माझ्याबरोबर खेळत होते. जणू ते (पिल्लू) माझा ताण दूर करण्याचा प्रयत्न करत होते.

मला ही संपूर्ण सहल हळूहळू जमिनीवर पडणाऱ्या एखाद्या पिसाप्रमाणे वाटली. मी, स्वामी विदितात्मानंदजी यांचे "Management Wisdom from the Bhagvatgita" हे पुस्तक प्रवासादरम्यान वाचत असताना, त्यांच्या 'प्रयत्न, वेळ आणि कृपेच्या' संकल्पनेला प्रत्येक टप्प्यावर मला आलेल्या अनुभवांशी जोडू शकले.

जुल्ले (नमस्कार)

आश्रम वार्ता

डी.एस.पी.पी.एल. सामाजिक जनजागृती अन सक्षमीकरणासाठी आयोजित या महीन्यातील व्याख्याने

डिसेंबर २०२१ पासून डी.एस.पी.पी.एल विविध विविध मान्यवरांची समाजपयोगी विषयांवरील व्याख्याने दर पौर्णिमेला आणि अमावस्येला आयोजित केली जातात. त्यामध्ये या महिन्यात अमावस्येला असीम फौंडेशनचे सारंग गोसावी तर पौर्णिमेला डॉ. रईस मणियार यांचे व्याख्यान आयोजित केले गेले. सारंग गोसावी यांनी केलेले काश्मीर तसेच इतर सीमावर्ती भागातील उल्लेखनीय काम, भारावून टाकणारे आहे. असीम फौंडेशनचा अगदी सुरुवातीपासूनचा प्रवास सारंग यांनी सर्वांसमोर उलगडला. अतिशय रोमांचकारी अन अद्भुत अश्या या प्रवासात सारंग यांनी त्यांना मिळालेले यश तसेच आलेल्या अडचणी याचे देखील वर्णन केले. त्यांच्या या व्याख्यानातून अनेकांना प्रेरणा मिळाली.

डॉ. रईस मणियार ही अशीच एक नामी हस्ती. गुजराती भाषेतील गझल कवी, अनुवादक, नाटककार, स्तंभलेखक, संगीतकार, गीतकार आणि पटकथा लेखक. एक प्रस्थापित 'मानसोपचारतज्ञ'असून सुध्दा त्यांनी तो व्यवसाय सोडून पूर्णपणे विद्यार्थी आणि अभ्यास पध्दती यातच स्वत:ला झोकून दिले. त्यांनी मुलांसाठी केलेले काम अत्यंत उल्लेखनीय आहे. मातृभाषेतून शिक्षण या विषयाचा आधार घेत शास्त्र व गणित हे विषय द्विभाषिक (मातृभाषा व इंग्रजी) मधून शिकवल्याने मुलांची प्रगती अधिक चांगल्याप्रकारे होते हे त्यांनी तयार केलेल्या प्रयोगाद्वारे सिध्द केले आहे. गुजरात राज्य शासनाने देखील त्यांच्या कामाची दखल घेतली आहे. त्यांनी तयात केलेल्या पध्दतीनुसार आज गुजरातमध्ये अनेक शाळांमध्ये या पध्दतीचा उपयोग केला जातो. सर्व उपस्थितांनी सदर कार्यक्रमाचे कौतुक केले.





दिवीजा जोशी
वय: ११ वर्षे

आश्रमातील कला अंगण

सानवी दलाल
वय: १० वर्षे

आपल्या आश्रमात आपल्या अनेक साधकांच्या कलेचा आस्वाद आपण कधी संगीतातून,नृत्यातून तर कधी चित्रकलेतून घेतला आहे. रांगोळी तर अनेक उत्सवाचा एक आनंदाच सोहळाच असतो जणू. आणि आता तर आपल्या मोठया साधकांच्या साथीला आपले छोटे छकुले साधकही ह्या रांगोळी सोहळ्यात आनंदाने सहभागी होत आहे. आणि त्यांची कला तर क्या कहेने! पुढे येणाऱ्या वर्षात आपल्या आश्रमात या लहानग्या कलाकारांच्या सुदंर रांगोळ्याचे प्रदर्शन पाहायला मिळेल यात शंकाच नाही. ह्या दोन रांगोळ्या त्याची झलक तुम्हाला नक्की दाखवतील.

सद्‌गुरू के प्रति
पूर्ण शरणागति होनी चाहिए ॥

17

सदगुरूंच्या ठायी पूर्ण शरणागति असायला हवी

शरणागति म्हणजे केवळ श्रद्धा नव्हे, तर समर्पण. बऱ्याच वेळेला समर्पण, श्रद्धा, विश्वास हे शब्द एकाच अर्थाचे असल्यासारखे वापरले जातात. परंतु ह्या तीन शब्दांमध्ये बराच फरक आहे. समर्पण हा शब्द स्वतःच्या अस्तित्वाला मिटवणे ह्या अर्थाने वापरला जातो. येथे अद्वैत अभिप्रेत असते. इतर दोन शब्दांमध्ये मात्र द्वैत आहे. तेथे ज्याच्यावर श्रद्धा किंवा विश्वास ठेवावा आणि ज्याने श्रद्धा किंवा विश्वास ठेवावा अश्या दोन व्यक्तिमत्वांची गरज असते. त्यामुळे श्रद्धा आणि विश्वास हे एक दोघांतील नाते असते. तसे पाहीले तर ते घट्टही असू शकते तसेच सैलही असू शकते. त्यामुळे ह्या नात्यांमध्ये दोघेही तसे मुक्त असतात. एखाद्यावर विश्वास ठेवला आणि त्याने अपेक्षेप्रमाणे विश्वास सार्थ नाही ठरवला तर विश्वासाच्या नात्याला तडा जाऊ शकतो. तसेच एखाद्यावर अमाप श्रद्धा ठेवली आणि त्या श्रद्धेय व्यक्तीने जर श्रद्धाळुला अपेक्षित असा परिणाम नाही दिला तर श्रद्धाळुच्या श्रद्धेला एका क्षणात तडा जाऊ शकतो. त्यामुळे ह्या दोनही गोष्टींमध्ये अपेक्षा ह्या गोष्टीचा मोठा भाग असतो. आणि जेथे अपेक्षा असते तेथे ती भंग होऊ शकते. त्यामागे अपेक्षाभंगाचे दुःख व त्यानंतर येणारे नैराश्य ह्या गोष्टीही साधारण येतातच. परंतु समर्पणाचे तसे नसते. समर्पणात समर्पित आणि ज्याला समर्पण केले आहे तो असे दोघे नसतात. ते एकच होतात. हे अद्वैत. दोघे नसल्याने ह्याला नाते म्हणता येत नाही. तो समर्पित स्वतःचे अस्तित्व दुसऱ्या अस्तित्वात मिसळून टाकत असतो. तो समर्पिताचा मृत्यु असतो. मर्त्याला अपेक्षा नसतात त्यामुळे साहाजिकच त्याला अपेक्षाभंगाचे दुःख नसते. त्याला हे नाते तोडायचा अधिकारच नसतो कारण नातेच मुळात तुटलेले असते. एखाद्या चहाच्या कपात साखर टाकल्यानंतर राहते ती अवीट गोडी. आता साखरेच्या दाण्यांना त्या चहातून बाहेर पडण्याचा मार्गच बंद झालेला असतो. महत्वाची गोष्ट म्हणजे त्या चहाला सुद्धा आता साखरेपासून वेगळे होता येत नसते. समर्पणात सुद्धा ज्याला समर्पित होतात त्याचेही स्वरूप बदललेले असते. हे महत्वाचे. तेथे दोन जीवांचे पूर्ण मिलन असते. स्वतःला मिटवून झालेले ते समर्पण. अर्पण हा शब्द त्यात महत्वाचा आहे. अर्पणामध्ये मागे फिरायचे दोर कापलेले असतात. म्हणून समर्पण हे सर्वात कठीण.

येथे स्वामी संपूर्ण हा शब्दही समर्पणाच्या आधी वापरत आहेत. असे का? कारण बऱ्याच वेळेला विश्वास आणि श्रद्धेत असलेले आपल्याला समर्पणात आहोत असे वागत, बोलत, चालत असतात. त्यांना कदाचित समर्पणाची कल्पनाच नसते. तो त्यांचा एक भ्रम असतो. अशी माणसे स्वत:ला मागे फिरायला जागा ठेवतात. एखादी पळवाट उघडी ठेवतात. आपण समर्पणात आहोत ह्याचा आभास तयार करतात. स्वामींना असे अर्धवट किंवा चुकीचे समर्पण येथे अभिप्रेत नाही. येथे एक कथा सांगतो. एकदा कबीर मुनी आपल्या हातमागावर वस्त्र विणत असताना गावची काही मंडळी त्यांच्याकडे आली आणि म्हणाली आम्हाला समर्पण म्हणजे काय हे समजून घ्यायचे आहे. कबिर काही बोलले नाहीत. त्यांनी आपले विणण्याचे काम चालूच ठेवले. दोनच मिनिटांत कबिरांनी आपल्या हातातील हत्यार खाली टाकले. ते कबिरांच्या समोरच पडले होते. भर दुपारचा वेळ होता. कबिरांनी आपल्या शिष्याला– कमलला– ओरडून सांगितले कि एक कंदील घेऊन ये आणि मला ते हत्यार शोधून दे. कमल खरोखरच एक जळता कंदील घेऊन आला आणि त्याने काही क्षणातच ते समोरच पडलेले हत्यार त्यांच्या हाती सोपवले. काही वेळाने त्या आलेल्या गृहस्थांनी पुन्हा एकदा कबिराला विचारले, “अजूनही तुम्ही सांगितले नाहीत कि समर्पण म्हणजे काय?” कबिर हसले व दुर्लक्ष करून पुन्हा एकदा कमलला हाक मारून म्हणाले कि अरे ही माणसे कधीपासून येथे बसली आहेत. त्यांना भूक लागली असेल. तू त्यांच्यासाठी मालपुवा बनवून घेऊन ये आणि त्या मालपुव्यांत चांगले मीठ घाल बरे का? थोड्याच वेळात कमलने मालपुवे आणले आणि त्या लोकांना खाऊ घातले. त्याच्यातील मिठामुळे ते लोक अस्वस्थ झाले पण त्यांनी ते खाल्ले खरे. आणखी काही काळाने त्या गृहस्थांनी कंटाळून जाऊन पुन्हा विचारले, “कबिरा, आता तरी सांगशिल का? कि तुझ्याकडे उत्तर नाही?” कबिर शांतपणे म्हणाले, “अरे मला वाटले एव्हाना तुम्ही समर्पण म्हणजे काय हे समजले असाल. मी सांगितले म्हणून त्या कमलने भर दुपारी कंदील आणून माझे हत्यार आणून दिले. त्याला माहीत नव्हते का, आता कंदीलाची गरज नाही? त्याला काय माहीत नाही कि मालपुव्यात मीठ घालत नाहीत? पण तो समर्पणात आहे. तो आपली बुद्धी वापरत नाही. तो माझ्याच डोळ्यांतून पाहतो, माझ्याच कानातून ऐकतो, माझ्याच तोंडून बोलतो. त्याने आपल्याला मिटवले आहे. हे समर्पण. ते समर्पण शब्दांत नाही सांगता येत. कारण समर्पण ही काही प्रक्रिया नव्हे, ती तर एक अवस्था आहे.”

आगामी उपक्रम: रेकि शिबिरे

दिनांक	केंद्र/स्थान	श्रेणी	नोंदणीसाठी संपर्क
५ व ६ माच	ठाणे	१ ली	गिरिष कर्णीक (९४२२००२६०८)
५ व ६ मार्च	अहमदाबाद	१ ली	किनल पंड्या (९७१४५१५८३९)
५ व ६ मार्च	चैनई	१ ली	अरूणा (७२५९६२०८६८)
१२ व १३ मार्च	मुंबई (बोरीवली)	१ ली	अर्चना पाटील (९८२०३७०४६९)
१२ व १३ मार्च	राजकोट	१ ली	निमिषा भट (९४२७७२६९१७)
२६ व २७ मार्च	नाशिक	१ ली	मोनाली राक्षे (९४२०६९२१३६)
२६ व २७ मार्च	हैद्राबाद	१ ली	माधवी (९८२४५८०९१२९) रामलींगम (९९११५५५९७४)
२६ व २७ मार्च	पूणे	१ ली	अमृत कीरपेकर (९१७५०५०९००)
२६ व २७ मार्च	चिपळूण	१ ली	जयंती काटदरे (९४०५८४९३६४)
९ व १० एप्रिल	मुंबई (दक्षिण)	१ ली	शारदा गुरव (९८१९२१५६५०)
९ व १० एप्रिल	बंगळूर	१ ली	सिंधू राजीव (९८८६०२१७०९)
९ व १० एप्रिल	कुडाळ (पावशी)	१ ली	प्रकाश भोगटे (८९५६५०२०३९)


१५ मार्च
आश्रमाच्या
२२व्या
वर्धापन दिनाच्या
शुभेच्छा